Rashtriya Aarogya Nyaya Sanshodhan Sanstha
**NOOTAN HOMOEOPATHIC MEDICAL COLLEGE AND HOSPITAL**
(Recognized By NCH, New Delhi & Affiliated to MUHS, NASHIK )
Narsinhgaon (Landgewadi), Kavathe Mahankal Dist- Sangli.

Ph : 02341 222738 Email- nootanhch@gmail.com

Date: 16/ 12 / 2023

# PART III-B-6

## Utilization of student welfare schemes

| Details | Availability | Remark |
|---|---|---|
| Earn and Learn Scheme | Yes | |
| Book bank scheme | Yes | |
| Savitribai phule vidyadhan scheme | Yes | |
| Dhanvantari vidyadhan scheme | Yes | |
| Bahishal Shikshan Mandal scheme | Yes | |

16/12/2023
PRINCIPAL
Nootan Homoeopathic Medical College & Hospital
Narsinhgaon, Kavathe Mahankal
Dist- Sangli. 416419, Maharashtra

Scanned by CamScanner

Rashtriya Aarogya Nyaya Sanshodhan Sanstha
NOOTAN HOMOEOPATHIC MEDICAL COLLEGE AND HOSPITAL
(Recognized By NCH, New Delhi & Affiliated to MUHS, NASHIK )
Narsinhgaon (Landgewadi), Kavathe Mahankal Dist- Sangli.
Ph : 02341 222738 Email- nootanhch@gmail.com

Date: 16/ 12 / 2023

# Utilization of student's welfare schemes

| Sr. No. | Name of student welfare scheme | MUHS Sanction letter no. | No. of students benefited |
|---|---|---|---|
| 1. | Savitribai Phule Vidhyadhan Scheme | मआविविएसडब्लू स्कीम/681/2022 Dated- 01/06/2022 | A.Y.2021-22 5 students |
| 2. | Earn and Learn | मआविवि एसडब्लू स्कीम/682/2022 Dated- 01/06/2022 | A.Y.2021-22 3 Students |
| 3. | Dhanwantari Vidhyadhan scheme | मआविवि एसडब्लू स्कीम/554/2022 Dated- 25/04/2022 | A.Y.2021-22 2 Students |
| 4 | Bahishal Shikshan Mandal Scheme | मआविवि/एसडब्लू स्कीम / 1606/2022 Dated- 20/12/2022 | 160 students |
| 5 | Dhanwantari Vidhyadhan scheme | मआविवि/एसडब्लू स्कीम / 1872/2023 Dated- 24/11/2023 | A.Y.2022-23 1 Students |

16/12/2023
PRINCIPAL
Nootan Homoeopathic Medical College & Hospital
Narsinhgaon, Kavathe Mahankal
Dist- Sangli. 416419, Maharashtra

Scanned by CamScanner

49


# महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक

**MAHARASHTRA UNIVERSITY OF HEALTH SCIENCES, NASHIK**

वणी-दिंडोरी रोड, म्हसरुळ, नाशिक – ४२२००४,

Vani-Dindori Road, Mhasrul, Nashik - 422004

EPABX: 0253-2539100-300, Phone: 0253-2539170, 173

Website : www.muhs.ac.in, E-mail : sw@muhs.ac.in

MUHS

डॉ. मनोजकुमार बी.मोरे
एम.डी. (आयुर्वेद)
संचालक, विद्यार्थी कल्याण

Dr.Manojkumar B. More
M.D. (Ayurved)
Director, Student Welfare


मआविवि/एसडब्ल्यू/स्कीम/ ६८९ /२०२२

दिनांक: ०९/०६/२०२२

"परिपत्रक क्र.९५/२०२२"

प्रति,
मा. अधिष्ठाता/प्राचार्य
सर्व संलग्नित महाविद्यालये,
म. आ. वि. वि. नाशिक.

**विषय :- सावित्रीबाई फुले – मुलींकरीता शिष्यवृत्ती योजनेबाबत...**

महोदय/महोदया

उपरोक्त विषयास अनुसरुन आपणांस कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२२-२३ करीता विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या महाविद्यालयांमध्ये पदवीपूर्व नियमित शिक्षण घेणाऱ्या व मागील वर्षात उत्तीर्ण झालेल्या तसेच नियमित पदवी आणि पदव्युत्तर शिक्षण घेणाऱ्या गरीब, गरजु, व हुशार विद्यार्थीनींचे प्रस्ताव अर्ज (परिशिष्ट "अ") प्रमाणे मागविण्यात येत आहेत.

सावित्रीबाई फुले मुलींकरीता शिष्यवृत्ती योजना करीता मा. अधिष्ठाता/प्राचार्यांनी प्रस्ताव विद्यापीठास पाठविण्यापूर्वी विद्यार्थीनीने सादर केलेल्या प्रस्तावाची छाननी करुन ती पात्र आहे किंवा नाही हे तपासून पाहावे. तसेच सदर योजनेची आवश्यकता असल्याची पूर्ण खात्री करुनच प्रस्ताव पाठविण्यात यावे. विद्यार्थीनींना भारत सरकार/शासनाच्या किंवा अन्य संस्थाकडून शिक्षणासाठी शिष्यवृत्ती, फेलोशिप शुल्क परतावा फी सवलत किंवा इतर काही अनुदान मिळत असेल किंवा मिळणार असेल अशा विद्यार्थीनींचे प्रस्ताव अपात्र ठरविण्यात येतील. विद्यार्थीनींनी महाविद्यालयामार्फत विद्यापीठास दि. २९/०७/२०२२ पर्यंत प्रस्ताव सादर करावे.

Scanned by CamScanner

(सदर योजनेकरीता आर्थिक वर्ष २०२२-२३ करीता करण्यात आलेला आर्थिक तरतुदीच्या आधीन राहून प्रति महाविद्यालय प्रति विद्यार्थीनी कमी होऊ शकतात याची नोंद घ्यावी.)

सावित्रीबाई फुले मुलीकरीता शिष्यवृत्ती योजना नियमावली अंतर्गत पात्र विद्यार्थीनींचे प्रस्ताव महाविद्यालयांच्या कव्हरीग लेटरसह दि. २९/०७/२०२२ पर्यंत विद्यापीठात स्विकारण्यात येतील. सदर योजनेचा लाभ घेण्यासाठी नियमावलीनुसार व विद्यापीठाच्या प्राधिकरणाने वेळोवेळी घेतलेल्या धोरणात्मक निर्णयाचा विचार करुन अनुदानाचे वाटप करण्यात येईल.

विद्यापीठाच्या योजना हया विद्यार्थ्यांना मिळणारी सवलत आहे, त्यांचा हक्क नाही असे त्यांना अवगत करण्यात यावे. तसेच सर्व अटी व शर्तीबाबत अंतिम निर्णय घेण्याचे अधिकार विद्यापीठाने राखुन ठेवलेले आहेत.

संचालक
विद्यार्थी कल्याण

प्रत माहितीस्वत: १) मा. कुलगुरु कार्यालय, मआविवि, नाशिक
२) मा. कुलसचिव कार्यालय, मआविवि, नाशिक
३) मा. वित्त व लेखा अधिकारी, मआविवि, नाशिक
४) सर्व विभाग प्रमुख, मआविवि, नाशिक

टिप :

१) वर नमुद योजनेची सविस्तर माहिती, नियमावली, विविध अर्ज व नमुने विद्यापीठाच्या www.muhs.ac.in या संकेतस्थळावर Department → Student Welfare→ Circular 2022-23 उपलब्ध आहे.

२) महाविद्यालयाने प्रस्तावांची पुर्तता करतांना तपासणी सूची (सहपत्र "व") प्रमाणे दस्तावेज तपासून अनुक्रमाप्रमाणे पृष्ठांकीत करुन सादर करावेत.

Scanned by CamScanner

महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक
MAHARASHTRA UNIVERSITY OF HEALTH SCIENCES, NASHIK
वणी-दिंडोरी रोड, म्हसरूळ, नाशिक - ४२२००४,
Vani-Dindori Road, Mhasrul, Nashik - 422004
EPABX: 0253-2539100-300, Phone: 0253-2539170, 173
Website : www.muhs.ac.in, E-mail : sw@muhs.ac.in

MUHS

डॉ. मनोजकुमार बी. मोरे
एम.डी. (आयुर्वेद)
संचालक, विद्यार्थी कल्याण

Dr.Manojkumar B. More
M.D. (Ayurved)
Director, Student Welfare

मआविवि/एसडब्लु/स्कीम/ ६८२ /२०२२ दिनांक : ०१/०६/२०२२

"परिपत्रक क्र. १६ /२०२२"

प्रति,
मा. अधिष्ठाता/प्राचार्य,
सर्व संलग्नित महाविद्यालये,
म. आ. वि. वि. नाशिक.

**विषय : कमवा व शिका योजनेबाबत...**

महोदय/ महोदया,

कमवा व शिका योजनेचे शैक्षणिक वर्ष २०२२-२३ करीता विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या महाविद्यालयांमध्ये पदवीपुर्व नियमित शिक्षण घेत असलेल्या गरीब, गरजु, हुशार विद्यार्थ्यांचे प्रस्ताव विद्यापीठामार्फत मागविण्यात येत आहेत.

कमवा व शिका योजनेत आर्थिक अडचणीमुळे कोणत्याही विद्यार्थ्यांचे शिक्षण थांबू नये याच भूमिकेतून विद्यापीठाने "कमवा व शिका" ही योजना अंमलात आणली आहे. गरीब, होतकरु व नियमित विद्यार्थ्यांना शिक्षण घेत असतांना निवडक स्वरुपाच्या कामांची संधी उपलब्ध करुन देऊन त्या मोबदल्यात नियमानुसार योग्य तो मेहनताना देवून त्यांच्या आर्थिक गरजा भागविणे व त्यांच्या शिक्षणास हातभार लावणे हा योजनेचा मुख्य हेतू आहे.

कमवा व शिका या योजने अंतर्गत **एका महाविद्यालयांतुन पाच प्रस्ताव स्विकारण्यात येतील.** सदर योजनेअंतर्गत ३% आरक्षण दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी असेल तसेच आपल्या महाविद्यालयातील दिव्यांग विद्यार्थ्यांचे प्रस्ताव महाविद्यालय स्तरावर निवड करुन सादर करण्यात यावेत. उपरोक्त नियमावली अंतर्गत पात्र विद्यार्थ्यांचे प्रस्ताव महाविद्यालयांच्या कव्हरींग लेटरसह **दि. २८/०७/२०२२** पर्यंत विद्यापीठात स्विकारण्यात येतील. सदर योजनेचा लाभ घेण्यासाठीची नियमावली सोबत जोडलेली आहे. उशिरा तथा विलंबाने प्राप्त झालेल्या कोणत्याही प्रस्तावावर विद्यापीठ कार्यवाही करणार नाही.

Scanned by CamScanner

तसेच योजने सबंधीचे प्रस्ताव अर्ज (विहित नमुन्यातील सहपत्र "अ") व इतर कागदपत्रे विद्यार्थी कल्याण विभागात परस्पर स्वीकारले जाणार नाहीत. कृपया याची नोंद घ्यावी.

विद्यापीठाच्या योजना हया विद्यार्थ्यांना मिळणारी सवलत आहे, त्यांचा हक्क नाही असे त्यांना अवगत करण्यात यावे. तसेच सर्व अटी व शर्तीबाबत अंतिम निर्णय घेण्याचे व त्यात बदल करण्याचे अधिकार विद्यापीठाने राखीव ठेवलेले आहेत.

संचालक
विद्यार्थी कल्याण

प्रत माहितीस्तव : १) मा. कुलगुरु कार्यालय, मआविवि, नाशिक
२) मा. कुलसचिव कार्यालय, मआविवि, नाशिक
३) मा. वित्त व लेखा अधिकारी, मआविवि, नाशिक
४) सर्व विभाग प्रमुख, मआविवि, नाशिक

टिप :

१) वर नमुद योजनेची सविस्तर माहिती, नियमावली, विविध अर्ज व नमुने विद्यापीठाच्या www.muhs.ac.in या संकेतस्थळावर Department → Student Welfare→ Circular 2022-23 उपलब्ध आहे.

२) महाविद्यालयाने प्रस्ताव सादर करतांना तपासणी सूची (सहपत्र "ब") प्रमाणे दस्तावेज तपासुन अनुक्रमाप्रमाणे पृष्ठांकीत करुन सादर करावेत.

Scanned by CamScanner

विद्यार्थी

# महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक

## Maharashtra University of Health Sciences, Nashik

वणी - दिंडोरी रोड, म्हसरुळ, नाशिक - ४२२००४.
Vani – Dindori Road, Mhasrul, Nashik – 422 004.
EPABX : 0253-2539100-300, Phone : 0253-2539170, 73
E-mail : sw@muhs.ac.in Web.:www.muhs.ac.in

MUHS

431

**डॉ. मनोजकुमार बी.मोरे**
एम.डी. (आयुर्वेद)
**संचालक, विद्यार्थी कल्याण**

**Dr.Manojkumar B. More**
M.D. (Ayurved)
**Director, Student Welfare**

मआविवि/एसडब्लु/स्कीम/१६०६/२०२२ दिनांक: २०/१२/२०२२

प्रति,
मा.अधिष्ठाता/प्राचार्य
नुतन होमिओपॅथीक वैद्यकिय महाविद्यालय
रुग्णालय, ता. कवठेमहांकाळ, जि. सांगली - ४१६४०५

**विषय : बहि:शाल शिक्षण मंडळ योजनेचे अनुदान आर.टी.जी.एस. केल्याबाबत....**
**संदर्भ : मआविवि/एसडब्लू/स्किम/६८०/२०२२ दि.०१/०६/२०२२**

महोदय/महोदया,

शैक्षणिक वर्ष २०२२-२३ साठी विद्यापीठाने लागू केलेल्या बहि:शाल शिक्षण मंडळ योजनेसाठीचे प्रस्ताव विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या महाविद्यालयांकडून मागविण्यात आले आहेत. योजनेच्या अटी व शर्ती तसेच विद्यापीठाच्या प्राधिकरणाने घेतलेल्या निर्णया नुसार प्रस्तावाची छाननी केल्यानंतर सदर योजनेचे अनुदान मिळणेकरीता आपल्या महाविद्यालयाचा प्रस्ताव पात्र ठरला आहे.

त्याअनुषंगाने योजने अंतर्गत विद्यापीठाचे अनुदान रु. १०,०००/- व ऑडीट फी रु. ५००/- असे एकूण रक्कम रु. १०,५००/- इतक्या रक्कमेचे आर.टी.जी.एस. दि. १६/१२/२०२२ रोजी महाविद्यालयाच्या बचत खात्यात जमाकरण्यात आले आहे. योजनेतंर्गत आपल्या महाविद्यालयात सिनीयर विद्यार्थी व नविन प्रवेशित विद्यार्थ्यांसाठी रॅगिंग विषयी व्याख्यानमाला व समुपदेशन, रॅगिंग विषयी शिक्षक व महाविद्यालय आवारातील इतर घटक उदा. वार्डन, कॅन्टीन स्टाफ, सुरक्षा रक्षक यांचेसाठी व्याख्यान माला, महिला सबलीकरण, स्त्री भ्रुणहत्या, व्यसनमुक्ती, संवाद कौशल्य विकास, व्यक्तीमत्व विकास, आपत्ती व्यवस्थापन, तणाव व्यवस्थापन अवयवदान जनजागृती, कुपोषण समस्या, रोकड रहित (Cashless) या विषयावर परिसंवाद/चर्चासत्रे/शिबीर आयोजीत करावयाची आहेत. सदर व्याख्यानमालेसाठी व परिसंवाद/चर्चासत्रे/शिबीर यासाठी वक्त्यांचे वैयक्तीक माहितीपत्र (बायोडाटा) या विभागाच्या माहितीसाठी पाठविण्यात यावा. सामाजिक जबाबदारीमध्ये विद्यापीठाचाही थोडाफार हातभार असावा या हेतूने सदर योजने करीता देण्यात येणारे अनुदान हे

Scanned by CamScanner

निव्वळ खर्च होण्यासाठी किंवा खर्चाची प्रतिपुर्ती म्हणून न पाहता समाज नवनिर्मितीच्या सहभाग घेऊन सामाजिक ऋणांची परतफेड करण्यासाठी मिळालेली संधी या दृष्टीने पह

**दि. २८/०२/२०२३ पर्यत अनुदान रक्कम खर्च करणे बंधनकारक आहे, याची कृपया नोंद घ्यावी**

तसेच विद्यापीठाने महाविद्यालयास सदर योजनेअंतर्गत दिलेल्या अनुदान रक्कमेच्या हिशोबाचे समायोजन करण्यासाठी पत्रात नमुद केलेल्या सुचनांच्या आधारे तसेच खालील नमुद केलेल्या सर्व कागदपत्रांची एकत्रितरित्या पुर्तता करुन **दि. ३१/०३/२०२३** पर्यत विद्यापीठास सादर करणे अनिवार्य आहे.

**बहि:शाल शिक्षण मंडळ योजनेची अंमल बजावणी करतांना पुढील सुचनांची नोंद घ्यावी.**

१) महाविद्यालयाने योजनेच्या माध्यमातून अनिवासी स्वरुपाची एक दिवसाची व्याख्यानमाला व एक दिवसाचे शिबीर/परीसंवाद/चर्चासत्र आयोजित करणे बंधनकारक आहे.

२) महाविद्यालयास यापेक्षा जास्त कार्यक्रम राबवावयाचे असल्यास त्यास मुभा राहील मात्र अतिरिक्त कार्यक्रमासाठी आलेला खर्च महाविद्यालयाला करावयाचा आहे.

३) योजनेतंर्गत विद्यापीठाने व्याख्यानमालेसाठी व परिसंवाद/शिबीर/चर्चासत्र यासाठी वक्त्यांना प्रवास भाडयाची अनुक्रमे स्थानिक प्रवास भाडे रु. २५०/- बाहेरगावहुन आलेल्या मान्यवरांसाठी जास्तीत जास्त रु.१,०००/- विद्यापीठ नियमानुसार अनुज्ञेय राहील. तरी जवळच्या मार्गाने होणारे प्रत्यक्ष जे प्रवास भाडे असेल त्यात फक्त एस.टी./रेल्वे द्वितीय श्रेणीचे प्रत्यक्ष प्रवास भाडे देण्यात यावे. कारने प्रवास केला असला तरी उपरोक्त प्रमाणेच कमाल देय रक्कम ग्राहय धरण्यात यावी. संस्थेने प्रवास भाडयाची अदायगी करतांना दक्षता घ्यावी. (विद्यापीठाच्या खर्चाच्या नियमानुसार करणे बंधनकारक आहे.)

४) वक्त्यांना/व्याख्यात्यांना अदा करण्यात आलेल्या मानधनाची व प्रवास भाडयाची कार्यक्रमनिहाय प्रत्येक वक्त्यांचे स्वतंत्र व्हाऊचर्स असणे बंधनकारक आहे.

५) योजनेमधील व्याख्यानमाला तसेच चर्चासत्र/शिबीर/परीसंवाद यासाठीचे विषय या पत्रात नमूद केलेले आहे. पत्रामध्ये दिलेल्या विषयांच्या व्यतिरिक्त शिबीराचे आयोजन करावयाचे असल्यास विद्यापीठाची पुर्व परवानगी घेणे आवश्यक आहे.

६) व्याख्यात्यांना / वक्त्यांना मानधन व प्रवास भत्ता व्यतीरिक्त किंवा निर्धारित मर्यादेपेक्षा जास्त रक्कम खर्च केल्यास अतिरिक्त अदायगीस मान्यता मिळणार नाही याची नोंद घ्यावी.

७) योजनेच्या कार्यक्रमस्थळी / व्यासपीठावर / मंडपात **"सदर व्याख्यानमाला महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक बहि:शाल शिक्षण मंडळाच्या विद्यमाने आयोजित"** असे दर्शविणारा बॅनर लावणे आवश्यक आहे.

८) कार्यक्रमाचे आयोजन व संयोजन, अतिथीचे स्वागत किंवा शिबीरार्थीचे चहापान व भोजन व्यवस्थेमध्ये भपकेबाजपणा असु नये. साध्या व सोप्या पध्दतीने परंतू स्वच्छ व निटनेटकी व्यवस्था असावी.

Scanned by CamScanner

९) विद्यापीठाने सोबत जोडलेल्या महाविद्यालयाने करावयाच्या खर्चाच्या तपशिला प्रमाणेच खर्च करण्यात यावा व त्याच प्रमाणे बीले समायोजनास पाठविण्यात यावी. अन्यथा अनुदानाची रक्कम परत विद्यापीठास पाठविण्यात यावी.

बहि:शाल शिक्षण मंडळ योजनेचे समायोजन करण्यासाठी पुढील कागदपत्रे सादर करणे अनिवार्य आहे.

१) कार्यक्रमाचा अहवाल, फोटोग्राफ्स/वृत्तपत्राची कात्रणे इ.

२) कार्यक्रमनिहाय व्याख्यात्यांना/वक्त्यांना अदा करण्यात आलेल्या मानधनाची मुळ व्हाऊचर्स (Original Vouchers) प्रत्येक वक्त्यांचे स्वतंत्र जोडावे.

३) कार्यक्रमनिहाय व्याख्यात्यांना / वक्त्यांना अदा करण्यात आलेल्या प्रवासखर्चाची मुळ तिकीटे प्रत्येक वक्त्यांचे व्हाऊचर्ससह सादर करावे.

४) कार्यक्रमासाठी प्रत्यक्ष झालेल्या इतर प्रशासकीय खर्चाची मुळ बिले (Original Bills) कार्यक्रमनिहाय व्हाऊचर्ससह खर्चनिहाय स्वतंत्रपणे सादर करावे. (प्रत्येक खर्चाच्या देयकानिहाय स्वतंत्र व्हाऊचर्स सादर करावे)

५) पत्रासोबत जोडलेल्या विहित नमुन्यातील उपयोगिता प्रमाणपत्र (Utilization Certificate ) सनदी लेखापालांकडून (Chartered Accountant) लेखा परिक्षण करुन सोबत जोडावे.

६) पत्रासोबत जोडलेल्या विहित नमुन्यातील जमाखर्च / हिशोब सनदी लेखापालांकडून प्रमाणित करुन सोबत जोडावे.

७) रु. ५००/- ची मुळ ऑडीट फी ची पावती सोबत जोडावी.

८) बहि:शाल शिक्षण मंडळ योजना राबविली नसल्यास किंवा योजनेचे अनुदान शिल्लक राहिल्यास सदर अनुदानाची रक्कम **"कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक"** यांच्या नावे नाशिक येथे देय असलेल्या धनाकर्षाद्वारे विद्यापीठास त्वरीत परत करावी अन्यथा सदर रक्कमेवर बॅंकेच्या प्रचलीत व्याज दराप्रमाणे व्याज आकारण्यात येईल.

९) शिल्लक राहिलेली रक्कम विद्यापीठास परत करण्यासाठी लागणारा खर्च मंजूर होणार नाही. सदर खर्च महाविद्यालयाने सोसावा.

१०) योजनेबाबतचा अहवाल व हिशोब पाठवितांना दोन्ही कार्यक्रम झाल्यानंतर लगेच महाविद्यालयाचा कामाचा अहवाल, वृत्तपत्रातील कात्रणे/फोटोग्राफस् व योजनेचे हिशोब पत्रव सनदी लेखापालाकडून (Chartered Accountant) लेखापरिक्षण करुन उपयोगिता प्रमाणपत्र (Utilization Certificate) व हिशोबपत्रकासह सोबत जोडलेल्या विहित नमुन्यात पाठवावे महाविद्यालयाने योजनेअंतर्गत दिलेल्या अनुदान रक्कमेच्या हिशोबाचे समायोजन करण्यासाठ पत्रात नमुद केलेल्या सुचनांच्या आधारे सर्व कागदपत्रांची एकत्रितरित्या पुर्तता करुन दि. ३१/०३/२०२३ पर्यत अधिष्ठाता/प्राचार्य यांनी प्रमाणित करुन विद्यापीठास सादर करणं आवश्यक आहे.

कृपया आर.टी.जी.एस. झाल्याची पोहोच उलट टपाली पाठवावी व योजनेबाबतच्या सर्व सुचनांचे तंतोतंत पालन करावे ही विनंती.

धन्यवाद !

संचालक
विद्यार्थी कल्याण

सोबत : वरीलप्रमाणे

Scanned by CamScanner

महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक
MAHARASHTRA UNIVERSITY OF HEALTH SCIENCES, NASHIK
वणी-दिंडोरी रोड, म्हसरूळ, नाशिक - ४२२००४,
Vani-Dindori Road, Mhasrul, Nashik - 422004
EPABX: 0253-2539100-300, Phone: 0253-2539170, 173
Website : www.muhs.ac.in, E-mail : sw@muhs.ac.in

**डॉ. मनोजकुमार बी.मोरे**
एम.डी. (आयुर्वेद)
**संचालक, विद्यार्थी कल्याण**

**Dr.Manojkumar B. More**
M.D. (Ayurved)
**Director, Student Welfare**


मआविवि/एसडब्ल्यू/स्किम/१८७२/२०२३ — दि. २८/११/२०२३

प्रति,
मा. अधिष्ठाता/प्राचार्य
नुतन होमिओपॅथीक वैद्यकीय
महाविद्यालय, रुग्णालय, नरसिंहगाव
ता. कवठेमहांकाळ
सांगली - ४१६४०५

**विषय :** धन्वंतरी विद्याधन योजना शै.वर्ष २०२२-२३ साठी विद्यार्थ्यांनी घेतलेल्या शैक्षणिक कर्जाच्या रक्कमेवरील व्याजाच्या रक्कमेचा (अनुदान) धनाकर्षाद्वारे पाठविणेबाबत...

**संदर्भ :** मआविवि/एस.डब्ल्यू/स्किम/४८२/२०२३ दि.१०/०३/२०२३ (परिपत्रक)
१) मआविवि/एसडब्ल्यु/स्किम/७२५/२०२३ दि.२७/०४/२०२३ (मुदतवाढ परिपत्रक ०१)
२) मआविवि/एसडब्ल्यु/स्किम/९३८/२०२३/ दि.३१/०५/२०२३ (मुदतवाढ परिपत्रक ०२)

महोदय/महोदया,

शैक्षणिक वर्ष २०२२-२३ करीता विद्यापीठाने लागू केलेल्या धन्वंतरी विद्याधन योजनेअंतर्गत विद्यार्थ्यांना बँकेकडून घेतलेल्या कर्जावरील व्याज अनुदान मिळावे या करीता उपरोक्त संदर्भीय परिपत्रकाच्या अनुषंगाने विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे प्रस्ताव मागविण्यात आले होते. प्राप्त झालेल्या प्रस्तावांची छाननी करतांना संदर्भीय परिपत्रका सोबत जोडण्यात आलेल्या नियमावलीतील नमुद केलेल्या अटी व शर्ती नुसार छाननी करण्यात आली. सदर प्राप्त प्रस्तावांमधून आपल्या महाविद्यालयातील पात्र झालेल्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक कर्ज घेतलेल्या खात्यावरती दि. १०/११/२०२३ रोजी आर.टी.जी.एस करण्यात आलेले आहे.

आपणांस कळविण्यात येते की सदर अनुदानाची रक्कम विद्यार्थ्यांस/विद्यार्थीनीस मिळाल्याची पोहोच पावती सोबत जोडलेल्या नमुन्यात विद्यार्थ्यांने/विद्यार्थीनीने ज्या बँकेकडून कर्ज घेतले आहे त्या बँक व्यवस्थापकाची सही व शिक्का घेऊन, विद्यापीठास दि.२८/०२/२०२४ पर्यंत उलट-टपाली पाठवावी.

धन्यवाद !

संचालक
विद्यार्थी कल्याण

टीप : विद्यार्थी/विद्यार्थीनीचे नावे असलेला नमुना बँक मॅनेजर सही/शिक्क्यासह पोहोच म्हणुन विद्यापीठास पाठवावा.

PRINCIPAL
Nootan Homoeopathic Medical College & Hospital
Narsinhgaon, Kavatho Mahankal
Dist.- Sangli. 416419, Maharashtra

Scanned by CamScanner